**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.**

---

## लाड पागे समिती शिफारशीनुसार दिवंगत/सेवानिवृत्त सफाई कर्मचारी यांचे वारसांना नियुक्ती देणेबाबत निवड समिती बैठक दिनांक ३१.०५.२०२२
## इतिवृत्त क्रमांक – २७

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील लाड कमिटीच्या शिफाराशीनुसार वारसाहक्काने नियुक्तीकरीता रिक्त असलेली पदे भरणेकामी कर्मचारी निवड समितीची दिनांक ३१.०५.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजीत केलेली बैठक दुपारी ३.३० वाजता अतिरिक्त आयुक्त, (सेवा) नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य बैठकीस उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | अतिरिक्त आयुक्त (सेवा) | :- अध्यक्ष |
| २) | उपआयुक्त( प्रशासन ) | :- सदस्य |
| ३) | उपआयुक्त (समाजकल्याण) | :- सदस्य |
| ४) | मुख्य लेखापरिक्षक | :- सदस्य |
| ५) | मुख्य वित्त व लेखाधिकारी | :- सदस्य |
| ६) | संचालक, घनकचरा व्यवस्थापन | :- सदस्य सचिव |

सदर बैठकीस कर्मचारी निवड समितीचे उपरोक्त सदस्य उपस्थित असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. विषयसूचीमधील नमुद विषयांच्या अनुषंगाने चर्चेस सुरूवात करणेत आली.

**संदर्भ :** (१) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०११ / प्र.क्र.३२७ / विघयो २, दिनांक २१ ऑक्टोबर २०११
(२) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०१४/प्र.क्र.०७/ महामंडळे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४
(३) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: सफाई-२०१५ प्र.क्र. २६८/महामंडळे,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई, दिनांक ११ मार्च, २०१६

**विषय क्र.०१ - नव्याने प्राप्त झालेले प्रकरणे**

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| १ | **श्री.अरुण रुपचंद दोंदे**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री. दिनेश अरुण दोंदे**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. दिनेश अरुण दोंदे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| २ | **श्रीम.छाया सत्यवान बिडलॉन**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री. किरण सत्यवान बिडलॉन** (मुलगा) | श्री.बिडलॉन यांचे चारीत्र पडताळणी अहवालात नमुदनुसार श्री. किरण सत्यवान बिडलॉन यांचेविरुध्द अंबड पोलिस स्टेशन येथे दाखल असलेली केस नं.२७२/२००९ भादवि ३२४, १४३ ,१४७, १४८, १४९, ५०४, ५०६, १३५ मधुन निर्दोश मुक्तता करुन सदरची केस निकाली काढणेत आली असल्याचे नमुद आहे.<br>**तथापि, सदर निकालाविरुध्द संबंधित पोलीस स्टेशनमार्फत अथवा अन्य त्रयस्थ व्यक्तीने मा. उच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल केले किंवा कसे याबाबतचा अहवाल संचालक (घ.व्य.वि.) यांचेमार्फत संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त करुन घेणेत यावा. अहवाल प्राप्त झालेनंतर सदर प्रकरणी कर्मचारी निवड समितीवर निर्णय घेता येईल असे निवड समितीचे मत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ३ | **कै.संतोष चंद्रभान जाधव**<br>मयत सफाई कामगार | **श्रीम. ज्योती संतोष जाधव** (पत्नी) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (१) या तरतुदीनुसार "**पत्नी**" या नात्याने **श्रीम.ज्योती संजय जाधव, हया सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ४ | **श्रीम. सुगंधा मधुकर काळे**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.अमित विजय जाधव**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार '**मुलगा**' या नात्याने **श्री. अमित विजय जाधव, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

02/6/2022
(डॉ.आवेश पलोड)
संचालक,घ.व्य.वि

(नरेंद्र महाजन) 3/6
मुख्य वित्त व लेखाधिकारी

(बी. जी. सोनकांबळे)
मुख्य लेखापरिक्षक

2/6
(दिलीप मेनकर)
उपआयुक्त (समाजकल्याण )

(मनोज घोडे पाटील )
उपआयुक्त (प्र.)

(अशोक आत्राम)
अतिरिक्त आयुक्त (सेवा)

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| ५ | श्री.दिपक प्रकाश चंडाले<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | श्री.अतुल अनिल चंडाले<br>(चुलत भाऊ - नामनिर्देशित व्यक्ती) | श्री.दिपक प्रकाश चंडाले, स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार,यांनी मनपा सेवा कालावधीत नामनिर्देशन पत्र (FORM -E) मध्ये त्यांचा चुलत भाऊ श्री.अतुल अनिल चंडाले, यांचे नाव नामनिर्देशित केले असुन त्यांचे रिक्तपदी मनपा सेवेत नियुक्ती होणेकामी श्री.दिपक चंडाले व त्यांची पत्नी सौ. सिमा चंडाले यांनी संमतीपत्र दिलेले आहे. नामनिर्देशीत वारसाने कुटुंबाचे पालन पोषण व सांभाळ करण्याची लेखी हमी घेत असल्याचे हमीपत्र सादर केले आहे.<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०१४/प्र.क्र.०७/ महामंडळे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ मधील तरतुदी अन्वये **नामनिर्देशीत वारस म्हणून श्री.अतुल अनिल चंडाले, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

विषय क्र. ०२ - यापुर्वी कर्मचारी निवड समितीचे निर्देशान्वये आक्षेप पुर्तता झालेले प्रकरणे

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| १ | कै.अरुण अशोक बर्वे<br>मयत सफाई कामगार | श्री. अश्विन अशोक बर्वे<br>(भाऊ - नामनिर्देशित व्यक्ती ) | सदरचे प्रकरण दिनांक ०४.०१.२०२२ रोजी कर्मचारी निवड समिती बैठकीसमोर सादर करणेत आले असता, श्री.अश्विन बर्वे यांनी सादर केलेल्या दस्तांपैकी वैद्यकिय प्रमाणपत्रामध्ये श्री.अश्विन अशोक बर्वे हे दोन्ही डोळयाने ४० % अधु असल्याचे नमुद असल्याने दि.१३ ऑगष्ट २००४ चे शासन निर्णयातील परिशिष्ट अ मध्ये अंध/अल्पदृष्टीबाबत सफाई कामगार संवर्गाच्या नियुक्तीस अपात्र असलेबाबत स्पष्ट नमुद असल्याने श्री.अश्विन अशोक बर्वे हे शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्तीस अपात्र होत आहे. त्यास्तव, श्री.अश्विन बर्वे यांना नेमणुक देता येत नाही.अशी शिफारस समितीने केल्याने सदरचा अर्ज निकाली काढणेत येत असलेबाबत दिनांक १०.०२.२०२२ रोजी कळविणेत आले आहे.<br>तथापि,श्री.अश्विन बर्वे यांनी दि. ०३.०३.२०२२ रोजी अर्ज सादर करुन दि.२६.०३.२०१९ रोजी चे डोळयांचे सर्टफिकेटमध्ये चुकुन उजव्या डोळया ऐवजी दोन्ही डोळे (both eyes) असे नमुद होते. वास्तवीक एकाच डोळयाचे अधुपन असल्याने त्यांनी पुन:श्च डोळयांची तपासणी करुन नाशिक मनपा जे.डी.सी. बिटको हॉस्पीटल,नाशिक यांचेकडील दि.२८.०२.२०२२ रोजीचे सुधारीत अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर केले असुन, दुरुस्ती दाखल्यानुसार सेवेत सामावुन घेणेबाबत श्री.बर्वे यांनी नमुद केले आहे.<br>श्री.अश्विन अशोक बर्वे यांनी सादर केलेले दोन्ही अपंगत्वाचे प्रमाणपत्र हे नाशिक महानगरपालिकेचेच असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यास्तव, श्री.बर्वे मा. जिल्हा शल्य रुग्णालय,नाशिक यांचेकडेस नेत्र तपासणी करुन सुधारीत अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत श्री.बर्वे यांना घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत पत्र देणे.<br>**तसेच, सदरचे प्रकरण मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने व स्वाक्षरीने निकाली काढणेत आलेले आहे. अर्जदाराने सदर प्रकरणी पुन:विलोकनार्थ नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे अथवा सक्षम प्राधिकारी यांचेकडेस अपिल दाखल करावे. असे समितीचे मत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

02/6/2022

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड)<br>संचालक,घ.व्य.वि | (नरेश महाजन) 3/6<br>मुख्य वित्त व लेखाधिकारी | (बी. जी. सोनकांबळे)<br>मुख्य लेखापरिक्षक | (दिलीप मेनकर)<br>उपआयुक्त (समाजकल्याण ) | (मनोज घोडे पाटील )<br>उपआयुक्त (प्र.) | (अशोक आत्राम)<br>अतिरिक्त आयुक्त (सेवा) |

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| २ | **श्रीम.सुनिता विजय पवार**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.अजय विजय पवार**<br>(मुलगा) | सदरचे प्रकरण दि.०४.०१.२०२२ रोजीच्या बैठकीसमोर सादर केले असता, श्री. अजय विजय पवार यांचे विरुध्द गुरनं.४७१/२०१७ जुगार प्रतीबंधक कायदा कलम १२ (अ ) प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निदर्शनास आल्याने महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग , नागपूर, दि.२१ नोव्हेंबर २००७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री. अजय विजय पवार हे लाड कमिटी शिफारशीच्या नियमानुसार नियुक्तीस अपात्र होत आहे. अशी शिफारस समितीने केल्याने सदरचा अर्ज निकाली काढणेत येत असलेबाबत श्री. अजय पवार यांना दि.१०.०२.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.<br>तथापी, श्री. अजय विजय पवार यांनी त्यांचे विरुध्द गुरनं.४७१/२०१७ जुगार प्रतीबंधक कायदा कलम १२ (अ) प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हायातुन मा. न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केली असलेबाबत मा. न्यायाधीश (अ.श देशमुख) २ रे दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग कोर्ट नं.०२ नाशिक यांचा दि.१८.०१.२०२२ रोजी जारी केलेला अंतिम अहवाल आदेश सादर केला करुन सदरची नोकरी मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे.<br>तसेच, **सदरचे प्रकरण मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने व स्वाक्षरीने निकाली काढणेत आलेले आहे. अर्जदाराने सदर प्रकरणी पुन:विलोकनार्थ नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे अथवा सक्षम प्राधिकारी यांचेकडेस अपिल दाखल करावे. असे समितीचे मत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने व स्वाक्षरीने निकाली काढणेत आलेले प्रकरणांबाबत संबंधित अर्जदाराने सदर प्रकरणी पुन:विलोकनार्थ नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे अथवा सक्षम प्राधिकारी यांचेकडेस अपिल दाखल करावे. त्यानुसार प्राप्त प्रस्तावास नियुक्ती प्राधिकारी महोदय यांची मान्यता असल्याशिवाय अशी प्रकरणे कर्मचारी निवड समितीसमोर सादर करु नये. अशी शिफारस करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे सांगोपांग चर्चा होऊन निर्णय घेणेत आला की, कर्मचारी निवड समितीसमोर चर्चेसाठी ठेवणेत आलेल्या विषयसूचीनुसार सादर विषयांबाबत चर्चा करणेत आली. दिलेले निर्देश व सुचनांनुसार कार्यपुर्ती करणेत येऊन पुढील बैठकीत माहिती सादर करावी असे निर्देश समितीने दिले. तसेच, कर्मचारी निवड समितीची पुढील बैठकीचे नियोजन करणेत यावे असे समितीने सुचित करून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

02/6/2022
(डॉ.आवेश पलोड )
**संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

2/6
(नरेंद्र महाजन)
**मुख्य वित्त व लेखाधिकारी**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

(बी. जी. सोनकांबळे)
**मुख्य लेखापरिक्षक**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

2/6/22
**(दिलीप मेनकर)**
**उपआयुक्त (समाजकल्याण)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(मनोज घोडेपाटील)**
**उपआयुक्त (प्र.)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(अशोक आत्राम)**
**अतिरिक्त आयुक्त,सेवा**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर**
मा.आयुक्त सो., मनपा, नाशिक